# वि.स.पागे यांचे लोकशाही व सत्याग्रहाविषयीचे विचार

**सचिन हैबत्ती मरळे**, संशोधक विद्यार्थी राज्यशास्त्र अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

**प्रस्तावना**

स्व. विठ्ठल सखाराम पागे यांचा जन्म २१ जुलै १९१० रोजी सांगली जिल्हयातील बागणी येथे झाला. त्याचे प्राथमिक व माध्यमिक शिक्षण बागणी, तासगांव व कराड येथे झाले. त्यांनी सांगली येथील विलिंग्डन महाविद्यालयातून संस्कृत विषय घेऊन बी.ए. पदवी व कोल्हापूर येथील विधी महाविद्यालयामधून एल.एल.बी. पदवी संपादन केली. काही काळ त्यांनी कराड, तासगांव येथे वकीली केली.

विद्यार्थी असतानाच १९३० च्या कायदेभंग चळवळीमध्ये, १९४० च्या वैयक्तिक सत्याग्रहामध्ये व १९४२ च्या 'छोडो भारत' या आंदोलनात त्यांनी सक्रीय सहभाग घेऊन कारावास सोसला होता. महात्मा गांधींच्या विचारसरणीचा त्यांच्या व्यक्तिमत्वावर खोलवर प्रभाव होता. महात्मा गांधींच्या विचारसरणीवर त्यांची गाढ श्रद्धा होती. वेदाबरोबरच नवनवीन शास्त्रे, संशोधने, विचारधारा त्यांनी आस्थेने अभ्यासल्या होत्या. भांडवलशाही, समाजवाद, लोकशाही, साम्यवाद हे विषयही त्यांना अध्यात्माइतकेच प्रिय होते. मराठी, हिंदी, इंग्रजी, संस्कृत, बंगाली व गुजराथी या भाषांवर त्यांचे प्रभुत्व होते. प्रचंड वाचन, प्रगाढ चिंतन आणि प्रसन्न प्रतिपादन ही त्यांच्या व्यक्तिमत्वाची वैशिष्टये होती. संगीताचीही त्यांना आवड होती. ज्ञानेश्वरी व तुकारामांची गाथा या विषयांवर त्यांचे प्रभुत्व होते. संत साहित्याचे व अध्यात्माचे ते गाढे अभ्यासक होते.

**लोकशाहीसंबंधी विचार**

वि.स.पागे यांनी भारतातील लोकशाहीबद्दल विचार मांडले आहेत. पागे यांच्या मते, 'लोकशाही प्रथांचा उगम ज्या नगरराज्यात झाला त्यामध्ये आता पुष्कळ फरक पडला आहे. नगरराज्यात सर्वांना मताचा अधिकार नव्हता. स्त्रियांना मताचा अधिकार नव्हता. मुलांना मताचा अधिकार नव्हता. त्यावेळी गुलामगिरीची प्रथा होती. या गुलामांना मताचा अधिकार नव्हता. हे लोक सोडून जे काही थोडेसे लोक उरावयाचे त्यांनाच फक्त मताचा अधिकार होता. पण एक गोष्ट निश्चित की, असे असुनसुद्धा सांस्कृतिकदृष्टया ही लोकशाही खूप विकसित झाली होती. त्यातूनच त्यावेळी प्लेटो, ॲरिस्टॉटल वगैरे जे तत्वज्ञ निर्माण झाले, त्यांच्याबद्दल आजही आपल्याला अभिमान वाटतो. त्या लोकशाहीतून ही माणसे निर्माण झाली. काही लोकांना यासाठी उपेक्षा, हाल सोसावे लागले आणि या पद्धतीने लोकशाही प्रथांचा उगम झाला. नगरराज्याच्या लोकशाही धर्तीवर इंग्लंडची लोकशाही निर्माण झाली. आणि परवा परवापर्यंत इंग्लंडमध्ये मजुरांना मताचा अधिकार नव्हता. स्त्रियांना मताचा अधिकार नव्हता. किंबहुना हिंदुस्थानात स्त्रियांना मताचा अधिकार असावा अशी चळवळ सुरू झाल्यानंतर इंग्लंडमध्ये स्त्रियांना मतांचा अधिकार होता, तर काहींना मताचा अधिकार नव्हता, अशी अवस्था होती.

त्यावेळी 'पोलिटिकली प्रिव्हिलेज्ड' व 'पोलिटिकली अंडर—प्रिव्हिलेज्ड' म्हणजे राजकीयदृष्टया काही खास हक्क असलेले व राजकीयदृष्टया काही खास हक्क नसलेले अशी समाजाची विभागणी करण्यात आली होती. डिक्शनरीमध्ये 'डेमॉक्रसी' या शब्दाचा अर्थ काय? हे जर आपण पाहिले तर डेमॉक्रसी म्हणजे "Government by the direct or representative" असा एक अर्थ आहे. तसाच "Politically under Privileged people" असाही एक अर्थ आपल्याला त्यात पाहावयाला मिळेल. डेमॉ म्हणजे पोलिटिकली अंडर—प्रिव्हिलेज्ड आणि 'क्रसी' म्हणजे विशिष्ट वर्गाची राज्यपद्धती. तेव्हा डेमॉक्रसीमध्ये राजकीयदृष्टया काही खास अधिकार नसलेल्यांना राज्यकारभार चालविण्याची संधी मिळाली पाहिजे. मग आजच्या लोकशाहीची ज्यावेळी या निकषांच्या आधारावर आपण तपासणी करतो त्यावेळी Democracy without Democracy अशी अवस्था बऱ्याच ठिकाणी असलेली आपल्याला आढळेल

परंतु भारतामध्ये प्रौढ मतदान पध्दती स्वीकारल्यामुळे सर्व स्त्री—पुरूषांना मताचा अधिकार दिल्यामुळे आपल्याला असा दावा करावयास हरकत नाही की,आज भारतात 'पोलिटिकली अंडर—प्रिव्हिलेज्ड' असे कोणी राहिले नाही.तरीसुध्दा जगातल्या विचारवंतांनी याही पुढे जाऊन

असा विचार केला आहे की, वयात आलेल्या सर्व स्त्री—पुरूषांना मताचा अधिकार दिला असला तरी त्यांना स्वतंत्रपणे मताचा अधिकार आहे का? स्वतंत्रपणे मत देण्याची त्यांची पात्रता आहे काय? भोवतालची समाजव्यवस्था अशी आहे का? वि.स.पागे यांच्या मते, अजूनही लोकांना पुरेसे काही मत स्वातंत्र्य नाही. कारण आपण पाहतो की, आपण प्रत्येक गावात प्रत्येक मतदाराला भेटावयाला काही जात नाही. गावातल्या २—४ माणसाला विचारले की, ते आपल्याला सांगतात की, तुम्ही लोकांच्या मताची काळजी करू नका, सगळे गाव आपल्या हातामध्ये आहे. याचा अर्थ काय हे आपल्याला लक्षात आलेच असेल. आता दुसऱ्या पध्दतीने विचार करणाऱ्या लोकांचा असा दावा आहे की, मतदानाचा हक्क असलेल्या प्रत्येक व्यक्तीचे मतस्वातंत्र्य राहावयाचे असेल तर समाज आर्थिकदृष्टया स्वतंत्र झाला पाहिजे. प्रत्येक ५ वर्षानंतर लोखंडी पेटीत आपल्या मताची चिट्टी टाकण्याचा अधिकार त्याला मिळाला म्हणजे त्याला मत स्वातंत्र्य मिळाले असे नाही. त्याची मानसिक गुलामगिरी गेली पाहिजे. समाजामध्ये मोकळे व निर्भय वातावरण निर्माण झाले पाहिजे. राजकीयदृष्टया काही विचार करून प्रत्येकाने मत द्यावयाचे असा समाज निर्माण झाला पाहिजे. तेव्हा या गोष्टी करणे आवश्यक आहे, असे काही विचारवंतांचे मत आहे. तेव्हा 'डेमॉक्रसी' या शब्दाच्या व्याख्येचे कोडे काय आहे? तांत्रिक शब्दात लोकशाही आणि समाजवाद हे एकत्र येतील काय? का त्या वेगवेगळया कल्पना आहेत, असा प्रश्न विचारला तर मी असे म्हणेन की, लोकशाही आणि समाजवाद या दोन्ही कल्पनांचा अर्थ एकच आहे. कारण जोपर्यंत माणसाला आर्थिक आणि सामाजिक स्वातंत्र्य नाही, तोपर्यंत स्वतंत्र मतदानाला अर्थ काय? मतदार जरी स्वतंत्र झाला असला तरी त्याला आर्थिक व सामाजिक स्वातंत्र्य नाही. आर्थिक व सामाजिक स्वातंत्र्य लोकांना मिळाले म्हणजेच समाजवाद येईल, समाजातील आर्थिक व सामाजिक विषमता नष्ट झाली म्हणजेच समाजवाद येईल . समाजवादाचा दुसरा अर्थ तरी काय आहे, तेव्हा लोकशाही आणि समाजवाद हे भिन्न आहेत असे जे काही लोक मानीत आहेत त्यात कोठेतरी गल्लत आहे. ते दोन्ही परस्पर विरोधी नाहीत तर परस्परपूरक आहेत. राजकारणात आर्थिक व सामाजिक स्वातंत्र्य मिळाले की आपोआप स्वतंत्रपणे मतदान होईल आणि हे मतस्वातंत्र्य आले की, मग त्यावेळी खरी लोकशाही निर्माण होईल.

वि.स.पागे यांच्या मते, खऱ्या अर्थाने संपूर्ण मतस्वातंत्र्य आज मिळालेले आहे. फक्त राजकीय दृष्टया लोकशाहीत मत टाकण्याचा अधिकार लोकांना मिळालेला आहे. ही अशी लोकशाही आपल्याला विकसित करावयाची आहे आणि ही लोकशाही हळूहळू कशी विकसित व स्वतंत्र होईल हे पाहिले पाहिजे. म्हणजेच पोलिटिकली अंडर प्रिव्हिलेज्ड आणि प्रिव्हिलेज्ड असा भेद नष्ट झाला पाहिजे . राजकीय उन्नती झाली; पण आर्थिक व्यवस्थेचे काय? एवढे स्वातंत्र्य मिळाल्यानंतर आर्थिक स्वातंत्र्याच्या अभावी त्याचा काही तरी उपयोग करता येईल काय? आर्थिक स्वातंत्र्य न मिळाल्यामुळे राजकीय स्वातंत्र्याचा उपयोग करता येत नाही. यासाठी पहिली शर्त कोणती असेल तर ती ही की, लोकशाहीची कल्पना स्पष्ट व्हावयाला पाहिजे. खऱ्या लोकशाहीसाठी आर्थिक आणि सामाजिक समता प्रस्थापित व्हावयाला पाहिजे. ते झाले की, मग जेवढे स्वातंत्र्य मिळाले त्याचा विस्तार अन्य क्षेत्रात करता येईल. अशा रीतीने स्वातंत्र्याचा वापर केला पाहिजे.

पहिल्यांदा लोकशाहीचे ज्ञान मिळाले पाहिजे. प्रथम एज्युकेशन आणि मग डेमॉक्रसी असे सांगितले जाते. हे साऱ्या जगाचे तत्वज्ञान आहे. सर्व जगामध्ये रिव्होल्यूशन होते. मग एज्युकेशन सुरू झाले. अशा ठिकाणी डेमॉक्रसी येणार नाही, याबाबत गणित चुकले आहे. ते कोठे चुकले हे शोधून काढावयाला पाहिजे. जे दोष आहेत ते दूर करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. एक स्वातंत्र्य मिळाले आणि दुसरे गमावून बसावयाचे हे बरोबर नाही. याबाबत गणित चुकले आहे. लोकशाहीची आपली कल्पना काय आहे ती स्पष्ट करावयाला पाहिजे. आज काय परिस्थिती आहे? जिकडे तिकडे गोंधळ निर्माण झाला आहे. मनमतांचा गलबला आणि कोणी न पुसे कोणाला अशी आजची परिस्थिती आहे. या कन्फ्युजनला एकच उत्तर आहे. कॉ. लेनिन यांनी एक फार उत्कृष्ट असा प्रबंध लिहिला आहे. तो अत्यंत महत्वाचा आहे. त्यामध्ये कॉ. लेनिन यांनी स्पष्टतेवर म्हणजे वैचारिक किंवा सैद्धांतिक स्पष्टतेवर भर दिला होता. काही म्हणतात की, लोकशाही हवीच

कशाला. वसंत व्याख्यानमालेत एका प्रोफेसरने समाजवादी देशामध्ये लोकशाहीची मूल्ये काय आहेत, प्रथा कोणकोणत्या आहेत याबाबत एक व्याख्यान दिले. समाजवादी देशामध्ये लोकशाहीचा अविष्कार कसा कसा होतो हे सांगण्याचा प्रयत्न केला. समाजवादी देशामध्ये लोकशाही म्हणजे लोकांची लोकशाही असे समजले जाते. पण आपण नुसतेच लोकशाही म्हणतो. त्याठिकाणी लोकशाही नसताना लोकांची लोकशाही असे म्हटले जाते, याला लोकशाही म्हणावयाचे काय? वास्तविक याबाबत स्पष्टता हवी. आम्हाला समाजरचना कोणत्या प्रकारची हवी आहे. ती नसेल तर ती कशाप्रकारे निर्माण करावयाची, ते निर्माण करण्याची पद्धत कोणती, त्यासाठी कोणती पथ्ये पाळावयाची, पद्धत काय? मेथड काय? मीन्स काय? साधने काय? या सर्वांबाबत स्पष्टता असावयाला हवी; पण याबाबत बराच गोंधळ चालू आहे. नियम वगैरे शिकविणे महत्वाचे आहे. त्यासाठी वाचन केले पाहिजे, पण अनुभव असा आहे की, प्रत्यक्ष काम करावयाला जातो. त्यावेळी नियमाने काम भागत नाही असे दिसून येते.

वि.स.पागे यांच्या मते, इंग्लंडमध्ये प्रतिनिधिक लोकशाहीची जाणीव जास्त प्रमाणात आहे. उदा. तेथे सभागृहात सदस्यांना न पुकारता ते ज्या शहरातून निवडून आले असतील त्या शहराच्या नावाने पुकारले जातात. जसे नाशिक म्हटले की, नाशिकचे प्रतिनिधीत्व करणारे सदस्य बोलतील आणि त्यांच्या मुखाने सर्व नाशिक बोलेल; परंतु जर सभापतींचा आदेश धुडकावून लावून ते सदस्य बोलू लागले तर त्यांचे नाव घेतले जाते. यालाच आपण “Naming of the Member by the chair”असे म्हणतो. कारण त्या प्रतिनिधिंनी सभापतीचा अवमान करण्याचा आदेश आपल्या मतदारांकडून घेतलेला नसतो. तसा अवमान करून तो बोलू लागल्यास तो शहराचे प्रतिनिधित्व करीत नाही,असे समजून त्याला सभागृहाबाहेर घालवले जाते. अर्थात आपल्याकडे प्रतिनिधिचे भान तेवढे प्रगत झालेले नाही. उदा. नुकत्याच झालेल्या निवडणूकीमध्ये पक्षाच्या जाहिरनाम्याला जेवढे कमी महत्त्व दिले गेले तेवढे कोणत्याच निवडणुकीत दिले जात नाही. त्या निवडणुकीतील भाषणांतून जाहिरनाम्याचा उल्लेख नव्हता. बरेच लोक तर जाहिरनाम्याशिवाय उभे होते. आपण उभे राहिलो व आपले नाव जाहिर झाले, एवढाच जाहीरनाम्याचा त्यांचा अर्थ असावा. वस्तुत: प्रतिनिधिक लोकशाहीत जाहिरनामा हे महत्त्वाचे डॉक्युमेंट आहे. तसेच मतदारांशी उमेदवाराने केलेला तो करार आहे. उमेदवाराचा पक्ष हा त्याला जामीन असतो. या निवडणुकीत अशा कराराचा मात्र पत्ताच नव्हता. म्हणून प्रतिनिधिक स्वरूप कमी होत चाललेले आहे. त्यामुळे पक्षांतर वाढत चालले आहे. पक्षांतर केले याचा अर्थ पहिला करार मोडून दुसरा करार केला; परंतु ज्या लोकांशी पहिला करार केला होता, त्यांना न विचारता पहिला करार मोडून दुसरा करार एकतर्फी केला. हे पक्षांतर अनिष्ट होय. कारण लोकशाहीच्या मूलभूत कल्पनांना या करार भंगामुळे धक्का मिळतो. म्हणूनच लोकशाहीच्या आपल्या कल्पना व आपण लोकांचे प्रतिनिधित्व करतो; याची स्पष्टता होण्याची अत्यंत गरज निर्माण झालेली आहे. लोकशाही आणि त्यातल्या त्यात समाजवाद हा एक फार गुळगुळीत शब्द झाला आहे. उद्या एखादा गट भांडवलशाहीला समाजवाद म्हणून लागला, तर त्यात आश्चर्य वाटायला नको. कारण ग्रामीण भागात अशी म्हण आहे की, गुळगुळीत पैसे हे जत्रेमध्ये चालवावे. तेव्हा लोकशाहीचा व समाजवादाचा अर्थ स्पष्ट झाला नाही, तर आजची राजकीय पध्दत फार काळ टिकेल असे वाटत नाही. कारण जनतेचे प्रश्न या पध्दतीने सुटले नाही, तर ही पध्दत बदलली गेल्यास लोकांना फारसे वाईट वाटणार नाही. कारण जनतेचे प्रश्न सुटण्यासाठीच कुठलीही राज्यपध्दती आवश्यक असते. तुम्ही जर तुमचे प्रश्न सोडविण्यासाठी हवे ते करता, जमेल तशा निष्ठा बदलता तर मग आपण जनतेला दोष देऊ शकणार नाही. यावरून वि.स.पागे यांचे लोकशाही संबंधीचे विचार स्पष्ट होतात.

**सत्याग्रहाविषयीचे विचार**

लोकप्रतिनिधीने लोकांच्या प्रश्नाला वाचा फोडली पाहिजे, ही गोष्ट मला मान्य आहे. कार्यकर्त्याच्या अंगी विधायक कार्याची प्रवृत्ती असली पाहिजे. लोकांचे प्रश्न मांडण्यासाठी सत्याग्रह करावा लागतो. आज या लोकशाहीमध्ये सत्याग्रहाचे स्थान काय असावे? यासाठी आपल्याला सत्याग्रहाचा इतिहास पाहावा लागेल. याबाबतीत डॉ. आंबेडकर, लोकमान्य टिळक यांचे काय मत होते ते पाहावे लागेल. डॉ. आंबेडकरांनी चवदार तळयाचा सत्याग्रह केला. त्यांनी त्यावेळी

सांगितले की, 'मी कायदा मोडत नाही, तर लोकांना पाणी पिण्याचा हक्क मिळवून देण्याचा प्रयत्न करीत आहे. तेव्हा त्यासाठी सत्याग्रह करावयाला हरकत नाही, त्यासंबंधी कोर्टातून हुकुम आला तुम्ही थांबा. त्यावर सत्याग्रही म्हणाले, 'आम्ही सत्याग्रह थांबविणार नाही' तेव्हा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी विचारले की, 'सत्याग्रह करावयाचा तो कोणाविरूध्द? रूढीविरूध्द, सनातनाविरूध्द, कोर्टाविरूध्द की कायद्याविरूध्द? डॉ. आंबेडकरांनी आपला सत्याग्रह थांबविला. त्याविषयी सांगितले की, कोर्टाने आपला हक्क अमान्य केलेला नाही; थांबावयास सांगितले आहे. तेव्हा आपण थांबले पाहिजे. मी कायदा मोडावयास कोणाला शिकविले नाही, शिकविणार नाही. तेव्हा डॉ. आंबेडकरांना सत्याग्रह मान्य नव्हता का? त्यांनी आपले म्हणणे सांगितले आहे, त्यांचा प्रश्न संपला. त्यानंतर लोकमान्य टिळकांचे मत काय? लोकमान्य टिळकांच्या वेळी सत्याग्रहाचा उदय खऱ्या अर्थाने सुरूझाला नव्हता. टिळकांचा शेवटचा काळ म्हणजे गांधीच्या कार्याची सुरूवात टिळकांनी कायदा मोडला म्हणून त्यांना सहा वर्षाची शिक्षा झाली, असे जरी असले परंतु टिळकांनी कायदा मोडला हे त्यांना मान्य नव्हते. मी कायदा कसा मोडला नाही, असे सहा दिवस कोर्टामध्ये सांगत होते. म्हणजे कायदा मोडणे टिळकांनाही मान्य नव्हते. टिळकांना गांधीजींनी एकदा विचारले होते की, 'कायदा मोडावयास काय हरकत आहे'?टिळकांनी उत्तर दिले होते की, 'अनैतिक कायदा मोडावयाला पाहिजे, ते ठिक आहे. उच्चनैतिक जीवन जगणाऱ्या अशा व्यक्तीने अनैतिक वाटणारे कायदे मोडावयाला हरकत नाही, म्हणजे टिळकांचाही प्रश्न संपला. गांधीजींनी अनेक सत्याग्रह केले.

या सत्याग्रहाची मीमांसा जर आपण पाहिली तर सामुदायिक सत्याग्रह गांधीजींनी आणला. "As a Substitute for war" त्यांनी आणला आहे. शस्त्राच्याआधारे आपल्याला आपले हक्क प्रस्थापित करता येतात. ज्या ठिकाणी पार्लमेंट नसेल; त्या ठिकाणी शस्त्र घेऊन लढावयाचा हक्क—अधिकार आपल्याला आहे. पण शस्त्राशिवाय अहिंसात्मक सत्याग्रहाने प्रश्न सुटतात. ते आपण सोडविले आहेत. हे गांधीजींनी जगाला दाखवून दिलेले आहे. "Democracy is one step aheadtowards non-violence". ज्यांनी सत्याग्रहाचेशास्त्र संशोधिले आहे त्यांनी असे सांगितले आहे की,"Only answer means individual Satyagrah','Only answer is tolerance".तेव्हा केवळ १४४ कलम मोडले की, त्याला सत्याग्रह म्हणत नाहीत. सत्याग्रह म्हणजे विशिष्ट कायदा जाणूनबुजून मोडला जातो, त्याला सत्याग्रह म्हणतात. 'कॉन्शस लॉ ब्रेकींग' करावयाचे असेल, तर तो कायदा अनैतिक आहे. लोकहिताचा नाही, हे जर सभासदाला पटले, तर त्याने सांगितले पाहिजे की, 'विधिमंडळामध्ये मला रस नाही'. त्याने विधिमंडळ सदस्यत्वाचा राजीनामा देऊन बाहेर लोकमत जागृत केले पाहिजे. त्यासाठी काही नवीन प्रथा पाडावयाच्या असतील तर त्या नवीन प्रथा पाडल्या पाहिजेत. काही बाबतीत मतभेद होऊ शकतात. मी गांधीवादातून हे शिकलो की, 'जर कायदा मोडावयाचा असेल तर येथे राजीनामा देऊन मग आपण कायदा मोडला पाहिजे; परंतु आपण अगदी शेवटी जागे होतो.लोकांच्या हिताच्या, नैतिकतेच्या आड कायदा आला, तर तो सत्याग्रह करून मोडला पाहिजे ते कर्तव्य आपले आहे.

**संदर्भग्रंथ सूची**


१. पागे वि. स., (१९८९), 'बेकारी निर्मुलनातून ग्रामविकास', यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई.
२. पागे वि. स., (१९९४), 'भारतीय राष्ट्रवाद एक चिंतन', वि. स. पागे. वाङमय प्रकाशन समिती, मुंबई.
३. पागे वि. स., (१९९२), 'भारतातील दारिद्रय स्वरूप व निवारण', (संक) ल. भा. मंत्री, दास्ताने रामचंद्र आणि कंपनी, पुणे.
४. पागे वि. स., (१६ नोव्हेंबर १९६९), 'रोजगार भिमुख ग्राम नियोजन', औंदुबर येथे शिबिरात निबंध वाचन.
५. पागे वि. स., (१४ आक्टोंबर १९६९), 'एकात्मिक क्षेत्र विकास योजना आणि भारतीय समाजाची मानसिकता', औदुंबर येथे निबंध वाचन.
६. पागे वि. स., (२०फेब्रुवारी १९४९), 'काम करण्याचा हक्क माऊली मासिक'.
७. पागे वि. स., (२००५), 'विधान मंडळातील निवडक भाषणे व लेख', (मराठी आणि इंग्रजी) १९५२ ते १९७८, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई.
८. बोधले चंपाताई श्रीरंग, (२००८), 'वि. स. पागे यांचे जीवन व कार्य (१९१० ते १९९०)', अप्रकाशित, पीएच.डी शोधप्रबंध (इतिहास विभाग), शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.